




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com


**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक




● वर्ष : ०१ ● अंक : ३४१ ● पुणे ● शनिवार, दि. १९ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





आदित्य बिरला ग्रुपच्या इंद्रिया'चे पुण्यातील... 3





पुण्यात आता हेल्मेटसक्ती 4


## ठळक बातम्या

### शिवाजीनगरमध्ये इच्छुकांची फौज

**पुणे : (आरंभ पर्व)**

शिवाजीनगर मतदारसंघात या वेळी अटीतटीचा सामना रंगणार आहे. महाविकास आघाडीकडून इच्छुकांची फौज सध्या तयार आहे. तर महायुतीकडून लढण्यास इच्छुक वाढत आहेत. वंचित बहुजन विकास आघाडीच्या मात्र हालचाली थंडावल्या आहेत. काँग्रेसमधून माजी आमदार दीप्ती चवधरी, माजी नगरसेवक दत्ता बहिरट, मनीष आनंद, दिवंगत आमदार विनायक निम्हण याचे चिरंजीव सनी निम्हण हे चार उमेदवार प्रमुख दावेदार भाजपकडून विद्यमान आमदार सिद्धार्थ शिरोळे, निवेदिता एकबोटे, ॲड. मधुकर मुसळे, संदीप काळे, बाळासाहेब अमराळे इच्छुक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून रणजित शिरोळे हेदेखील तयारीला लागले मागील वेळी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराने दहा हजारांपेक्षा जास्त मते मिळवली होती, त्या पक्षाचा या वेळी काही गाजावाजा दिसून येत नाही.

### भाजपचा बालेकिल्ला अभेद्य !

**पुणे : (आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेपासून दिल्लीपर्यंत सत्ता, केंद्रात व राज्यात मंत्री पदे, राज्यसभेत खासदार अशा ताकदवर नेत्यांची मोठी फळी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाठबळ, पक्ष आणि विचारधारेशी बांधील मतदार यामुळे कोथरूड भाजपचा अभेद्य किल्ला. तर भाजप विरोधात उमेदवार कोण अशा चर्चेत असलेले महविकास आघाडीचे कार्यकर्ते. अशी सध्या कोथरूड विधानसभेची परिस्थिती आहे.

# महायुतीचं ठरलं : भाजप मोठा भाऊ, 155 जागांवर लढणार?

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मागच्या महिन्याभरापासून जागावाटपावर बैठका सुरू आहेत. एकीकडे महाविकास आघाडी तर दुसरीकडे महायुतीकडून उमेदवार निश्चित करण्यातची प्रक्रिया सुरु आहे. त्यातच आता माहयुतीचं जागावाटप फायनल झाल्याची माहिती आहे.



अमित शाह यांच्यासोबत शुक्रवारी रात्री झालेल्या बैठकीत जागावाटपाच्या फॉर्म्युलावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जागावाटपात भाजप हाच सर्वात मोठा भाऊ असल्याचं निष्पन्न होतंय. भाजप विधानसभा निवडणुकीत 155 पेक्षा अधिक जागा लढणार असल्याची माहिती आहे.

तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला 70 पेक्षा अधिक आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला 60 जागा मिळणार असल्याची माहिती आहे. भाजपच्या कोट्यातूनच मित्रपक्षांना जागा दिल्या जाणार आहेत. पुढील 24 तासात जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली आहे. 22 ऑक्टोबरपासून उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार असून अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख 29 ऑक्टोबर आहे. पुढे 30 ऑक्टोबरला दाखल अर्जांची छाननी होईल तर 4 तारीख ही अर्ज माघारी घेण्याची शेवटची तारीख आहे. 20 नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडेल आणि 23 नोव्हेंबरला मतमोजणी होईल.

त्यादृष्टीने महाविकास आघाडी आणि महायुती कामाला लागल्याचं दिसतंय. कमीत कमी नाराजी आणि निवडून येणारे उमेदवार देण्यासाठी लगबग सुरू आहे. यावेळच्या निवडणुकीत मराठा फॅक्टरकडे सर्वांचं लक्ष आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभेच्या रिंगणात उमेदवार उभे करण्याची तयारी दाखवली आहे. शिवाय काही ठिकाणी ते महायुती किंवा भाजपचे उमेदवार पाडूदेखील शकतात. यावेळच्या निवडणुकांकडे सर्वांचं विशेष लक्ष आहे. त्याचं कारण शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांची शकलं पडलेली आहेत. शिवसेनेतून बाहेर पडून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तर राष्ट्रवादीतून बंडखोरी करून अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. संख्याबळ असूनही भाजपचे देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री पदावर काम करावं लागलं आहे. त्यामुळे यावेळी कोण कुणावर बाजी मारणार? असा प्रश्न उपस्थित होतोय.

### दोन नेत्यांच्या मागणीने भाजप गोत्यात?

राज्यात विधानसभा निवडणूक होत आहे. अशातच प्रत्येक पक्षात उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. भाजपमध्ये दोन नेत्यांच्या मागणीमुळे अडचण निर्माण झाली असल्याचं चर्चा आहे. राधाकृष्ण विखे पाटील आणि नारायण राणे या दोन नेत्यांच्या भूमिकेमुळे महायुतीला गोत्यात आल्याची चर्चा आहे. एकच घरात दोघांना उमेदवारी मागितली जात असल्याने महायुतीसमोर नवा पेच निर्माण झाला आहे. अहमदनगर जिल्ह्यात विखे-पाटील कुटुंबातील दोघांना उमेदवारी मिळावी म्हणून फिल्डिंग लावली जात आहे. अहमदनगरमधील शिर्डी विधानसभा मतदारसंघात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आमदार आहेत. सातवेळा ते शिर्डीमधून निवडून आले आहेत. ते पुन्हा निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. तर राधाकृष्ण विखे पाटील यांचे पुत्र सुजय हे लोकसभेला पराभूत झाले. त्यामुळे सुजय विखे हे विधानसभा निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत. संगमनेर या विधान मतदारसंघातून त्यांना निवडणूक लढवायची आहे. माजी मंत्री काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या विरोधात निवडणूक लढण्याची तयारी सुजय विखे यांनी दर्शवली आहे. पण एकाच घरात दोघांना तिकीट मिळणार का? असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे.

# आमदार सुनील शेळके यांच्या अडचणी वाढणार?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाचे नेते बापू भेगडे यांनी महामंडळ नाकारलं आहे. मावळ विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यावर बापू भेगडे ठाम आहेत. भेगडे यांची कृषी शिक्षण, संशोधन परिषदेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. पण अजित पवारांनी महामंडळ नाकारलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्याला मावळमधून उमेदवारी जाहीर करावी, असं बापू भेगडे यांनी म्हटलं आहे. "मला काही महामंडळ नकोय. मी ज्या गोष्टीची मागणी त्या मतावर ठाम आहे. माझ्या मागणीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि माझे कार्यकर्ते ठाम आहेत. म्हणून मी आज पत्रकार परिषद बोलावली आहे", असं बापू भेगडे यांनी स्पष्ट केलं.



विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. त्यामुळे आता मावळ विधानसभा मतदारसंघात देखील उमेदवारी वरून रस्सीखेच पहायला मिळत आहे. सध्या मावळ विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्येच रस्सीखेच दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे यांची पक्षाकडून राज्य शासनाच्या महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, आपण या पदाची मागणी केली नाही त्यामुळे हे पद नको, असं बापू भेगडे यांनी स्पष्ट केलं आहे.

### शिरुरमध्येही डोकेदुखी वाढणार?

दरम्यान, अजित पवार यांची शिरुरमध्येदेखील डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. कारण शिरूरमध्ये आयात उमेदवार नको, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. पक्षाने आयात उमेदवार दिल्यास बंडखोरीची शक्यता आहे. अजित पवार गटाच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी ही भूमिका निश्चित करण्यात आली. दुसरीकडे भाजपच्या प्रदीप कंद यांना अजितदादा गटाकडून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. तसेच ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख माऊली कटके अजितदादा गटात प्रवेश करून उमेदवारीसाठी इच्छुक आहेत.






# रुपाली चाकणकर खडकवासल्यातून लढणार?



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याची विधानसभा निवडणूक जाहीर झाली आहे. अशातच पुणे जिल्ह्यातील खडकवासला विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर लढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. यावर रूपाली चाकणकर यांनी प्रतिक्रिया दिली. 2019 ला मी खडकवासला मतदारसंघाची मागणी केली होती. मी तिकडे काम करत होतेय आता महायुती म्हणून आम्ही ज्येष्ठ पदाधिकारी, अजितदादांकडे खडकवासला मागणी केली. पण महायुती म्हणून तो भाजपकडे आहे. आम्ही महायुती धर्म पाळू आणि काम करू, असं रूपाली चाकणकर म्हणाल्या.

बाहेरून आलेल्या लोकांना पक्षाचे ध्येय धोरणे माहित नसतात. अगोदर पक्षाचे ध्येयधोरणे समजून घ्यावे लागतात. त्याबद्दल जास्त न बोललेलं बरं... आपल्याला दिलेलं पद समाज आणि पक्ष याच्यासाठी करावा, ज्यांना आयोगाचा कार्यकाल माहिती नाही त्यांनी बोलू नये. विरोध कधी चांगले बोलत नाहीत. ते नेहमी टीका करतात. मी माझं काम करत आहे, असं रुपाली चाकणकर म्हणाल्या.

मी बचत गटापासून संघटनेचे काम करत आहे. महाराष्ट्राचे संघटना सांभाळले आहे. मला महाराष्ट्राची काम करण्यात आलं. महिला आयोगाचं पद हे संविधानिक पद आहे. पक्षाला सगळ माहिती होतं. मी लोकांच्या प्रश्नांसाठी काम करतेय. महिलांच्या प्रश्नांसाठी काम करतेय, असं चाकणकर म्हणाल्या.

राज्यात महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. याबाबत चाकणकरांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज्य महिला आयोग अध्यक्षपदाचा चार्ज घेतल्यानंतर आज पोलीस आयुक्त इतर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. बोपदेव घाट घटना आणि इतर घटनाबाबत घटना घडू नये, यासाठी काय करायला हवं. याबाबत सविस्तर चर्चा आयुक्तांनी केली.

पुणे शहरातील 274 हॉटस्पॉट काढले आहेत. महाविद्यालयीन तरुण-तरुणीच्या ठिकाणी जातात ती ठिकाणी पोलिसांना माहिती असली पाहिजे. राज्य महिला आयोगाने एक पत्र दोन दिवसापूर्वी एक पत्र दिला आहे बदलापूर, उरण,कोपरखैरणे प्रकरण झाली. बाहेरच्या राज्यातील व्यक्तीचं कॅरेक्टर सर्टिफिकेट असला पाहिजे, नवीन नागरिक राहायला येतात त्यावेळी त्यांची सर्व माहिती असली पाहिजे, असं चाकणकरांनी सांगितलं.

### रुपाली पाटील ठोंबरे नाराज का?

मी आधी सुद्धा मुद्दा मांडला होता इतर ही पक्षात लाडक्या बहिणी आहेत. परंतु एक व्यक्ती एक पद देण्यात यावं. काल मला चाकणकर बोलल्या की मी बाहेरची आहे, त्यामुळे हर्ट झाले. मग मी जाते बाहेर. मात्र दादा मला बोलले की मी तुम्हाला पक्षप्रवेश दिला आहे त्यामुळे तुम्ही तुमचं काम करा. मला दादांवर अभिमान की आम्ही 121 त्यांना तक्रार करू शकता. एवढा जर मोठे नेते बोलत असतील नाराज नव्हते मात्र एक खंत होती की मी बाहेरची यावर दादा बोलले. मानकर यांच्यासोबतही त्यांनी चर्चा केली, दादा यावर नक्कीच मार्ग काढतील, असा विश्वास रुपाली पाटील ठोंबरे यांनी व्यक्ती केला.






# भ्रष्टाचारावर नियंत्रण हवे



देशाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येक व्यवहारामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. दुर्दैव आपले सर्वांचे की, असे वातावरण आपल्या देशात पाहायला मिळत नाही. मागील दहा वर्षांत काळे धन शोधण्याच्या घोषणा झाल्या मात्र यात शोधण्याच्या प्रक्रियेत मोठे मासे सातासमुद्रापलीकडे केव्हा गेले हे समजले सुद्धा नाही. तेव्हा भ्रष्टाचारावर सरकारचे नि:पक्षपातीपणे नियंत्रण हवे. सध्या आपल्या राज्यात विधानसभेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. सर्व पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. त्यात मोठा मुद्दा भ्रष्टाचार हाच आहे. त्यामुळे आपण सत्तेवर आल्यावर भ्रष्टाचाराला गाढून टाकू असे पण वातावरण निर्मिती केले जाईल. मात्र देशाच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा भ्रष्टाचार आहे हे मतदार राजाने ओळखले पाहिजे. त्यानुसार आपले अमूल्य मतदान करायला हवे. त्यासाठी मतदार राजाने कोणत्याही आमिषाला बळी पडू नये तरच खऱ्या अर्थाने भ्रष्टाचाराला आळा बसेल. जो उमेदवार विकासकामांचा पाठपुरावा करून आपल्या विभागाचा विकास करेल त्या उमेदवाराच्या पाठीशी मतदार राजाने खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. त्याचप्रमाणे निवडणूक कार्यकाळात निवडणूक आचारसंहितेचे तंतोतंत पालन करावे. त्यासाठी मतदार राजाने जागृत रायला हवे. आता देशातील वाढता भ्रष्टाचार रोखण्याची मतदार राजाला हीच संधी आहे. जो उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे त्याला त्यांच्या कामाची पोहोचपावती देण्याची नामी संधी मतदार राजाला आली आहे. त्यानंतर पाच वर्षे थांबावे लागेल. निवडणुकीनंतर काय मी मूर्ख म्हणण्यापेक्षा भ्रष्टाचाराला जो उमेदवार कात्री घालील त्यालाच मी माझे मत देईन असे मनापासून मतदान राजाने ठरविले पाहिजे. देशातील भ्रष्टाचाराचा विचार करता चिरीमिरी करत करत प्रशासकीय अधिकारी पदापर्यंत गेलेल्या भ्रष्टाचाराला आता योग्य आळा बसण्यासाठी शासकीय स्तरावर कडक धोरण राबविणे गरजेचे आहे. यामुळे देशात आर्थिक विषमता वाढून अस्थिर वातावरण निर्माण होते. यात गरीब अधिक गरीब होत जातो, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातो. या दृष्टचक्रातून गरीब नागरिकांनी बाहेर आले पाहिजे. देशातील गरिबातील गरीब लोकांचे जीवनमान उंचवायला हवे. त्यासाठी भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य उपाय सुचवून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल. केवळ गरिबी हटावचा नारा देऊन चालणार नाही तर त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करावी लागेल. जेणेकरून त्यांचे राहणीमान सुधारण्यासाठी मदत होईल. श्रीमंत व गरीब ही जी दरी निर्माण झाली आहे ती कमी होऊन गरीब लोकांचे जीवनमान उंचवायला हवे.

मुख्य म्हणजे देशातील नागरिकांना त्यांच्या रिकाम्या हातांना काम मिळाले पाहिजे. जर सरकारला सरकारी नोकरी देता येत नसेल तर त्यांना किमान वेतन महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे मिळायला हवे. त्यात त्याच्या भविष्याची सुद्धा तरतूद हवी. त्यांचे वेतन सुद्धा त्यांच्या बँक खात्यात जमा झाले पाहिजे. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता सुशिक्षितांना नोकरीची हमी नाही, शिक्षण घेतले तरी मिळाली तर कंत्राटी नोकरी, निवृत्ती वेतनाचा प्रश्नच नाही मग सांगा म्हातारपणी कशाचा आधार घ्यायचा. यामुळे बेकारी वाढत असून सुशिक्षितांना अपुऱ्या वेतनावर काम करावे लागते. याचा परिणाम लोक भ्रष्ट मार्गाचा अवलंब करतात ते चक्र बदलले पाहिजे. तरच भ्रष्टाचाराला आळा बसेल. पूर्वी बंद घरे रात्रीची फोडली जात होती. सध्या तर दिवसा-ढवळ्या घरफोड्या होत आहेत ही देशाच्या विकासाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. सध्याच्या घडीला नोकऱ्या नसल्यामुळे विविध कार्यालयांच्या बाहेर टीचभर पोटासाठी सुशिक्षित बेकऱ्यांना दालालगिरी करावी लागत आहे. याचा परिणाम भ्रष्टाचारात वाढ होताना दिसत आहे. त्यात शासकीय बाबू सुद्धा काही ठिकाणी रंगेहात पकडले जात आहेत. मात्र त्यावर योग्यप्रकारे कारवाई होणे आवश्यक आहे. राज्यात रंगेहात पकडले जातात मात्र काही वर्षांनी पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता होऊन परत बाबू त्याच खुर्चीवर येऊन काम करतो. मात्र एवढी वेळ का आली याचा विचार होणे गरजेचे आहे. राज्यात वाढत्या लोकसंख्येप्रमाणे रोजगार देणे सरकारचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे सुशिक्षित बेकारांना बेकारी भत्ता देता आला पाहिजे. यासाठी सरकार कटिबद्ध असायला हवे. आता निवडणुकीच्या रिंगणात असणारे उमेदवार भ्रष्टाचाराच्या बाबतीत काय बोलणार? याचे उत्तर गुलदस्त्यात असले तरी आतापर्यंत काय झाले ते पुढे काय होणार हे मात्र निश्चित सांगता येणे कठीण आहे. मात्र याचे उत्तर मतदार राजाच्या आहात आहे. तेव्हा राज्यातील भ्रष्टाचाराला पूर्ण आळा बसवता आला नाही तरी झालेल्या प्रकरणावर योग्य कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. म्हणजे लोक जबाबदारीने काम करतील. तसेच प्रत्येकांनी आपल्या जबाबदारीने काम केले पाहिजे. मी भ्रष्टाचार करणार नाही अशी प्रत्येकांनी आपली मानसिकता तयार करायला हवी. लहान असो व मोठा असो त्याने जर भ्रष्टाचार केला असेल किंवा सिद्ध झाल्यास त्याच्या विरोधात पहिले पाऊल उचलायला हवे. त्यासाठी कोणतीही निर्णय प्रक्रिया चालू असताना त्यावर सुलभ आणि ताबडतो निर्णय घ्यायला पाहिजे. मुख्य म्हणजे प्रत्येक व्यवहारामध्ये पारदर्शकता असायला हवी. कोणताही निर्णय हा एकाकी न घेता विचारविनिमय करून एकमेकांच्या सहमतीने घ्यावा. भ्रष्टाचार करणाऱ्यावर लागलीच कडक कारवाई करावी. तेव्हा भ्रष्टाचार दिसेल त्या ठिकाणी आवाज उठविला पाहिजे. वर्गणी गोळा केली तर त्याच्या पावत्या देणगीदारांना देता आल्या नसतील, तर त्यावर आवाज उठविता आला पाहिजे. हीच गोळा बेरीज भ्रष्टाचाराला कारणीभूत असते. तेव्हा प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार होणार नाही यासाठी सरकारने भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवायला हवे. तरच देशातील भ्रष्टाचाराचा भस्मासुर रोखणे शक्य आहे.

## गाव विकणे आहे इथं पासूनचा प्रवास ते माफक टॅक्स लागू होण्यापर्यंत येऊन संपला..!!

*नवले ब्रिज येथे कृती समितीचा भव्य जल्लोष*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेत समाविष्ट 32 गाव कृती समितीच्या लढ्याला अखेर यश आले मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे स्वागत व जल्लोष समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी नवले ब्रिज येथे गुलाल उधळून, पेढे वाटून तर फटाके वाजवून आनंद व्यक्त केला.

कृती समितीने वारंवार केलेल्या पाठपुराव्यामुळे 32 गावांना न्याय मिळाला आहे. कृती समितीच्या माध्यमातून माजी राज्यमंत्री विजयबापू शिवतरे,आमदार भीमराव




अण्णा तापकीर आणि रमेशबापू कोंडे यांचा यावेळी नवले ब्रीज येथे सत्कार करण्यात आला. यावेळी 32 गाव कृती समितीचे राहुलभाऊ पोकळे,विकासनाना दांगट, माजी सरपंच सुभाष नाणेकर, अरूण दांगट, नितीन दांगट, राहुल पायगुडे, संजय धावडे, बापूसाहेब पोकळे, सागर भूमकरआणि 32 गाव समितीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## आग लागून बिबवेवाडी परिसरात मालकाचा मृत्यू

**--- (दै. आरंभ पर्व)**

बिबवेवाडीतील सुखसागरनगर भागात डेअरीला आग लागून मालकाचा मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी (ता. 17) मध्यरात्री घडली. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. रामदास साळुंके (वय 65, रा. येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्या डेअरी मालकाचे नाव आहे.

या प्रकरणी बिबवेवाडी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सुखसागरनगर भागात साळुंके यांची किसान डेअरी आहे. याठिकाणी मध्यरात्री दूध वाहतूक करणारी वाहने येतात. त्यामुळे साळुंके दररोज डेअरीतच झोपत असत. गुरूवारी रात्री ते डेअरीत झोपले होते. मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास स्थानिक नागरिकांना डेअरीतून अचानक धूर येत असल्याचे दिसून आले. नागरिकांनी डेअरीचा दरवाजा तोडून पाण्याचा मारा केला. साळुंके यांना जखमी अवस्थेत बाहेर काढले.

कात्रज अग्निशामक दलाचे केंद्रप्रमुख सुनील नाईकनवरे यांच्यासह जवानांनी आग पूर्णपणे आटोक्यात आणली. गंभीर भाजलेल्या साळुंके यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## थोडक्यात

### सामाजिक कार्यकर्ते हनुमंत गाटे यांचे निधन



**बार्शी (आरंभ पर्व) :** सारोळे ता.बार्शी येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. हनुमंत (नाना) शंकर गाटे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते 55 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई पत्नी एक मुलगा व एक मुलगी, तीन भाऊ, भावजयी, पुतणे असा मोठा परिवार आहे. पुण्यातील हडपसर भागामध्ये त्यांनी नानाश्री ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून अनेकांना ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण दिले. सारोळे गावातील सामाजिक चळवळीमध्ये त्यांचा सहभाग असायचा. त्यांच्या निधनाने सारोळे गावावर शोककळा पसरली आहे.त्यांच्यावर सारोळे येथे सुन्न वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### जालना-नांदेड एक्सप्रेसवे प्रकल्पांसाठी स्वीकृती पत्र केले प्राप्त

**पुणे (आरंभ पर्व) :** पुण्यात आधारित प्रमुख इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी रोडवे सोल्यूशन्स इंडिया इन्फ्रा लिमिटेड (आरएसआयआयएल) ने आज जाहीर केले की त्यांनी एमएसआरडीसी कडून दोन महत्त्वाच्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांसाठी स्वीकृती पत्र ( एलओए) प्राप्त केले आहे: पुणे रिंग रोड आणि जालना-नांदेड एक्सप्रेसवे. या प्रकल्पांचा एकत्रित मूल्य रूपये 4700 कोटी असून, हे आरएसआयआयएल साठी एक महत्त्वाचे टप्पा दर्शवतात आणि भारताच्या परिवहन इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासाकडे कंपनीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहेत. पुणे रिंग रोड प्रकल्प पुणे महानगर क्षेत्रातील कनेक्टिव्हिटी वाढवण्याचा उद्देश ठेवतो, वाढत्या वाहतूक मागण्या पूर्ण करतो आणि प्रादेशिक आर्थिक विकासात योगदान देतो. या प्रकल्पामुळे प्रवाशांसाठी प्रवासाचा वेळ लक्षणीयपणे कमी होईल आणि सुरक्षा सुधारेल. त्याच वेळी, जालना-नांदेड एक्सप्रेसवे या दोन महत्त्वाच्या शहरांमध्ये वाहतूक अधिक सुलभ करेल, व्यापाराला प्रोत्साहन देईल आणि महाराष्ट्रातील प्रवेशयोग्यता वाढवेल. या नवीन जोडणीमुळे आरएसआयआयएलच्या ऑर्डर बुकने आता रूपये 10,000 कोटींचा टप्पा पार केला आहे. हे यश आरएसआयआयएल च्या मोठ्या प्रमाणातील इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करण्याच्या कौशल्याचे प्रतीक आहे.



### 'ग्लोबल एज्युकेशन फेअर 2024' ला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद

**पुणे (आरंभ पर्व) :** परदेशात शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी "स्टडी स्मार्ट'च्या वतीने 'ग्लोबल एज्युकेशन फेअर 2024'चे पुण्यातील बोट क्लब येथे आज 18 ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले. यामध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, दुबई येथील जवळपास 50 हून अधिक सर्वोत्तम विद्यापीठाच्या प्रतिनिधींशी चर्चा करता आल्याने विद्यार्थ्यांनी येथे मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. विद्यार्थी आणि पालकांना या ठिकाणी नि:शुल्क मार्गदर्शन मिळाले. ग्लोबल एज्युकेशन फेअर 2024'मध्ये एकाच छताखाली अनेक परदेशातील शिक्षणाच्या अनेक संधी व पर्याय उपलब्ध झाल्या. यावेळी इंद्र छाजेड (अध्यक्ष जितो पुणे चॅप्टर), चेतन भंडारी (उपाध्यक्ष जितो पुणे चॅप्टर), दिनेश ओसवाल ( मुख्य सचिव, जितो, पुणे चॅप्टर), गौरव भाटिया, विशाल जैन ( जितो, एज्युकेशन सहाय्यक कार्यक्रम) आदी मान्यवर उपस्थित होते.

## खडकवासला विधानसभेत भाजपचा चौकार?


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघात 2009 पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे त्यापाठोपाठ शिवसेनेचे प्राबल्य होते. हा मतदारसंघ तीन वेळा भाजपकडे आहे. या निवडणुकीत भाजप उमेदवार कायम ठेवणार की बदलणार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून कोण उमेदवार असेल, यावर बरीच गणिते अवलंबून आहेत.

*भाजपचे विद्यमान आमदार भीमराव तापकीर चौकार मारण्याच्या तयारीत, माजी आमदार कुमार गोसावी यांचीही इच्छा उमेदवार बदलल्यास भाजपमधील माजी नगरसेवक प्रसन्न जगताप, हरिदास चरवड, दीपक नागपुरे, दिलीप वेडे-पाटील इच्छुक*

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी उमेदवारी मागितली आहे. माजी नगरसेवक बाळा धनकवडे व काका चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे, संघटनेत कार्यरत असणारे उद्योजक राहुल घुले- पाटील यांच्या सह नऊ जणांनी उमेदवारी मागितली आहे. समाविष्ट गावांचा डीपी, गुंठेवारी प्रश्न प्रलंबित, महामार्ग, समाविष्ट गावांतील मुख्य रस्ते, अंतर्गत सर्व ठिकाणी वाहतूक कोंडी, सिंहगड रस्त्यावर पीएमपीएमएल बस डेपो नाही. परिणामी सार्वजनिक व्यवस्था दुर्लक्षित, खडकवासला धरणाच्या आतील गावांचे व धरणाखालील गावांत नदीत थेट सांडपाणी मिसळते, खडकवासला व सिंहगडाच्या पर्यटनासाठी पाठपुरावा कमी. समाविष्ट गावांत नागरिकांना उद्यान, क्रीडांगण नाहीत.

## खडकवासला विधानसभा लढण्यावर ॲड. जगताप ठाम




भारतीय जनता पार्टीतर्फे कोणत्याही उमेदवारांची अधिकृत उमेदवारी घोषित झालेली नाही. माध्यमातील वृत्तावर कोणीही विश्वास ठेवू नये. उमेदवारांची यादी पक्षाचे नेते जाहीर करतील. मी शेवटपर्यंत खडकवासल्याच्या उमेदवारासाठी प्रयत्न करत राहणार आहे. मला आशा आहे की पक्षश्रेष्ठी मला नक्की संधी देतील

- ॲड. प्रसन्नदादा जगताप, माजी उपमहापौर/इच्छुक उमेदवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून भाजपमध्येही जोरदार रस्सीखेच सुरू आहे. खडकवासला विधानसभेसाठी आमदार भीमराव तापकिर यांचे नाव फायनल झाल्याचे साम ह्या वृत्तवाहिनीने दिले होते.

त्यामुळे खडकवासला विधानसभेचे उमेदवारीचा पेच सुटला अशी शक्यता व्यक्त होती .

यानंतर इच्छुक शांत होतील असं वाटत असताना ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी खडकवासला विधानसभा लढण्यावर आपणं ठाम आहे. पक्षाने संधी दिल्यास खडकवासल्यात विजय मिळवून दाखवेल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

ॲड. जगताप यांच्या सर्व कार्यकर्त्यांच्या सोशल मीडियावर " वार फिरलय ,आमचं ठरलय.आमचा उमेदवार प्रसन्नदादा " अशा पोस्ट व्हायरल होत आहेत. यावरुन ते खडकवासल्यासाठी खूप आग्रही असल्याचे समजत आहे.

ॲड. प्रसन्नदादा जगताप हे सध्या पक्षश्रेष्ठींच्या संपर्कात असल्याने खडकवासल्याच्या उमेदवारी बाबत ट्विस्ट येणार का?याकडेही सर्वांचे लक्ष आहे. तूर्तास तरी आ.तापकीर यांना अभय मिळाला असल्याचे चित्र आहे.

## अश्विनीताई कदम यांची मोर्चेबांधणी सुरु !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या पर्वती मतदारसंघांमध्ये राजकीय घडामोडी घडत आहेत. हा मतदारसंघ कोणाच्या वाटेला जाणार आहे यावर शंका व्यक्त होत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या माजी नगरसेविका अश्विनी नितीन कदम यांनी जोरात मोर्चेबांधणी सुरू केली आहे..

मतदारसंघातील मतदारांच्या गाठीभेटी घेत तुमचे प्रश्न मी विधानसभेत नक्कीच मांडणार असा आशावाद व्यक्त करत आहेत.



पर्वती मतदारसंघांमध्ये गेली तीन टर्म भाजपच्या आ.माधुरी मिसाळ ह्या आमदार म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याविषयी मतदारसंघांमध्ये नाराजी असल्याचे सांगत मतदारांनी परिवर्तन करण्याचा निर्धार केला आहे.

असा आशावाद माजी नगरसेविका अश्विनीताई कदम यांनी आरंभपर्वकडे व्यक्त केला आहे. मतदारसंघातील मूलभूत प्रश्नच जर वंचित राहत असेल तर लोकप्रतिनिधी बदलायला हवेत. या मतदारसंघातील सर्व सामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी मी गेली पंधरा वर्षे पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून कार्यरत आहे.

यादरम्यान अनेक प्रश्न मी मार्गी लावले आहेत. यामुळेच जनतेतून मला चांगला प्रतिसाद आहे. यामुळेच पर्वती मतदारसंघातून मी निश्चित निवडून येणार असा विश्वास कदम यांनी व्यक्त केला आहे. मागील विधानसभा निवडणुकीमध्ये कदम यांनी चांगली कामगिरी केली होती. त्याआधारेच्या वेळी उमेदवार मिळेल असे त्यांना वाटते.

### नवरात्र उत्सवास नागरिकांचा चांगला प्रतिसाद

अरण्येश्वर नवरात्रोत्सव ट्रस्टकडून नवरात्रीच्या नऊ दिवसांत अनेक खेळ, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. लहानांपासून-वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी नवरात्रोत्सव आनंदात साजरा केला. दसऱ्यादिवशी ट्रस्टकडून 'लकी ड्रॉ'चे आयोजन करण्यात आले होते. यालाही नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. तसेच यावर्षी साकारलेला साडेतीन शक्तिपीठांचा देखावा साकारला होता, त्याला भक्तगणांनी गर्दी केली होती. विजयादशमीच्या निमित्ताने देवीची महाआरती करण्यात आली आणि उत्साहात दसरा साजरा करण्यात आला.

# आदित्य बिरला ग्रुपच्या इंद्रिया'चे पुण्यातील पहिले दालन सुरु



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिरला समुहाच्या दागिन्यांच्या ब्रँड इंद्रिया'ने पुण्यात आपले पहिले दालन उघडले आहे. जुलै महिन्यात लॉन्च झालेल्या या समूहाने एकूण आठ दालने उघडली आहेत - दिल्लीत तीन, इंदूर, अहमदाबाद, पुणे, मुंबई आणि जयपूरमध्ये प्रत्येकी एक. पुण्यातील बंड गार्डन येथील नवीन दुकानासह, समूह आपल्या मजबूत ब्रँड इक्विटी आणि बाजारपेठेतील सखोल अंतर्दृष्टीचा लाभ घेत, त्याच्या ग्राहक पोर्टफोलिओला आणखी बळकट करत आहे.

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेले पुणे शहर दागिन्यांच्या बाजारपेठेसह भरभराटीला येणारे आर्थिक केंद्र आहे. इंद्रियासाठी, हे शहर फॅशनने प्रेरित आणि वैविध्यसंपन्न आवड असलेल्या ग्राहकांशी संलग्न होण्याची एक अनोखी संधी देते. महाराष्ट्राची परंपरा आणि आधुनिकतेचे मिश्रण असलेले पुणे उत्कृष्ट हस्तकला प्रदर्शनासाठी एक आदर्श वातावरण प्रदान करते. आपल्या समृद्ध वारशामुळे आणि तरुण, गतिमान लोकसंख्येमुळे, पुणे हे शहर इंद्रियासाठी चोखंदळ वर्गाला मोठ्या संख्येने आकर्षित करून रचना आणि नवकल्पना या दोन्हींच्या शोधात असलेल्या ग्राहकांशी संपर्क साधण्यासाठी एक रोमांचक क्षितिज सादर करते.

आदित्य बिरला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिरला यांनी पुढील पाच वर्षांत भारतातील पहिल्या तीन दागिन्यांच्या रिटेल विक्रेत्यांमध्ये स्थान मिळवण्याच्या उद्देशाने जुलैमध्ये इंद्रियाची सुरुवात केली. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला तब्बल 5,000 कोटी रुपयांच्या अभूतपूर्व गुंतवणुकीचा पाठिंबा आहे, जो भारतातील दागिन्यांच्या रिटेल क्षेत्रात क्रांती घडवून आणण्याच्या आदित्य बिरला समूहाच्या वचनबद्धतेला अधोरेखित करतो.

'इंद्रिया' या ब्रँड नावाचा उगम संस्कृत भाषेतून झाला आहे. ही भाषा समृद्ध भारतीय संस्कृतीचे दुसरा स्वरूप आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर, इंद्रिया म्हणजे शक्ती; पाच इंद्रियांची ताकद, आपल्या चेतनेला चालना देणारी इंद्रिये, आपल्याला सभोवतालच्या जगाचा अनुभव घेण्यास आणि अन्वेषण करण्यास प्रवृत्त करतात. आपल्या अस्तित्वाची व्याख्या करतात! सुंदर ब्रँड चिन्ह म्हणून इंद्रियाने मादी चिंकारा हरणाची निवड केली आहे. हा प्राणी इंद्रियांचे रूपक असून स्त्रीचे सौंदर्य आणि शालिनतेचे प्रतीक आहे. ब्रँड अनुभव तुमच्या इंद्रियांना एकापेक्षा जास्त मार्गांनी गुंतवून ठेवेल आणि तुमचे हृदय 'दिल अभी भरा नहीं' गुणगुणायला प्रवृत्त होईल!

इंद्रियाचे सीईओ संदीप कोहली म्हणाले, "दागिने ही एक श्रेणी म्हणून केवळ गुंतवणुकीपासून एका स्टेटमेंटपर्यंतचे परिवर्तन करत आहेत. आमचा प्रस्ताव समजण्याजोगा फरक, विशिष्ट रचना, वैयक्तिकृत सेवा आणि अस्सल प्रादेशिक बारकावे यावर आधारित आहे. इंद्रियाच्या प्रस्तावाच्या केंद्रस्थानी विशेष लाउंजसह नाविन्यपूर्ण सिग्नेचर अनुभव आहे.इन-स्टोअर स्टायलिस्ट आणि तज्ज्ञ दागिन्यांच्या सल्लागारांसह सानुकूलन सेवा सर्व पाचही इंद्रियांना चालना देणे आणि एक अतुलनीय खरेदी प्रवास तयार करण्याचे वचन देतात. आमच्या श्रेणीतील सर्वोत्तम डिजिटल फ्रंट एंडमुळे डिजिटल आणि फिजिकल टचपॉईंटवर अखंड अनुभव निर्माण होईल. त्याचप्रमाणे दागिन्यांच्या किरकोळ व्यापारात नवीन युगाची सुरुवात होईल." इंद्रिया दालन स्वतःच्या पद्धतीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. तो एक स्टुडिओ असू शकतो, जिथे वैयक्तिक स्टायलिस्ट तुमच्यासाठी खास वस्तू तयार करतो, तो भारतीय शिल्पकलेचा उत्सव असू शकतो, भावी वधूसाठी एक कलाप्रकार असू शकतो, जिथे ती विविध प्रकारच्या उत्कृष्ट डिझाईनमधून पसंतीचे अलंकार शोधू शकते. या, संपूर्ण शहराचे हृदय कुठे गुंतले आहे ते पहा. आदित्य बिरला ग्रुपचा हॉलमार्क आहे विश्वासाचा अतूट धागा.. पुण्यातील पहिल्या इंद्रिया दालनाच्या साथीने उत्कृष्ट दागिन्यांचे विश्व अनुभवा.

# नेटफ्लिक्सच्या द ग्रेट इंडियन कपिल शो सीझन 2 मध्ये, बॉलीवूड स्टार्सच्या सुंदर पत्नीसोबत हा फनिवार मजेदार बनवा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

करवा चौथला एक नाही तर सात बॉलीवूड स्टार्स एकत्र येतील तेव्हा काय जादू होईल याची कल्पना करा! करीना आणि करिश्मा कपूर ही प्रसिद्ध बहिणीची जोडी प्रेक्षकांसमोर आणल्यानंतर, नेटफ्लिक्स फॅब्युलस लाइव्ह्स वर्सेज बॉलीवूड वाइव्ह्ज सीझन 3 च्या क्वीन - महीप कपूर, सीमा सजदेह, भावना पांडे, नीलम कोठारी सोनी, रिद्धिमा कपूर साहनी, शालिनी पासी आणि कल्याणी साहा यांना हसवण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. हा एपिसोड ग्लॅम, ग्रेस आणि गिल्ट प्लेजर शिवाय दुसरे काहीही नसण्याचे वचन देतो!

शो दरम्यान हसता हसता, कपिल शर्मा विनोदाने बॉलीवूड स्टार्सच्या पत्नींची त्यांच्या मोठ्या फॅन फॉलोइंगबद्दल प्रशंसा करतो, नंतर विचारतो, "तुम्ही कधी शोधून काढले आहे की या शोमध्ये कोणाला जास्त इंटरेस्ट आहे - पुरुष की महिला?" या प्रश्नाचे लगेच उत्तर देताना नीलम कोठारी सोनी म्हणाल्या, "खरं तर पुरुषांना गॉसिप करण्यात मजा येते." भावना पांडे त्यांना साथ देत म्हणाल्या, "हे खरे आहे की पुरुषांना गॉसिप करायला जास्त आवडते. पण नंतर ते त्यांच्या बायकांना दोष देतात आणि म्हणतात - यार तिने फॅब्युलस लाइव्ह्सचा शो लावला आहे, मी तर फक्त इथे बसून आहे पण प्रत्यक्षात त्यांनाही तो शो पाहायचा असतो."

सत्य हे आहे की, आपल्या सर्वांकडे असा एक गिल्टी प्लेजर असतो ज्याला आपण विरोध करू शकत नाही! जर तुम्ही आमच्यासारखेच उत्सुक असाल, तर आज रात्री 8 वाजता द ग्रेट इंडियन कपिल शो पाहायला विसरू नका, फक्त नेटफ्लिक्सवर!





## थोडक्यात



### मध्यरात्री नदीपात्रात पडलेल्या तरुणाला जीवदान

**पुणे (आरंभ पर्व) :** महापालिका भवन परिसरात नदीपत्रात मध्यरात्री पडलेल्या तरुणाची सुटका अग्नीशमन दलाच्या जवानांनी केली. छत्रपती शिवाजी पुलाजवळ नदीत एक जण पडल्याची माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाकडून कसबा अग्निशमन केंद्राला कळविण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे वाहन रवाना करण्यात आले. जवान घटनास्थळी पोहोचताच त्यांनी एक तरुण नदीपात्रातील पाण्याच्या प्रवाहामध्ये अडकल्याचे पाहिले.

### कर्मकांडातून व अंधश्रद्धेतून बाहेर पडने ही काळाची गरज : लवांडे

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** मनूस्मुतिपासुन ते आजच्या बुवाबाजी पर्यंत विविध राष्ट्रपुरुषांचे संत साहीत्याचे महानुभाव पंथाचे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या वीचारधारेचे उपस्थीतांना दाखले देवून अंधश्रद्धेतून व कर्मकांडातून बाहेर येण्याची कळकळीची विनंती करून मानवी जीवन सफल कसे होईल याकडे लक्ष केंद्रित करावे असं आवाहन विषेशतः तरुण वर्गाला केले हभप विकास लवांडे यांनी केले. पूर्व हवेली तालुक्यातील श्री कृष्ण मंदिर टिळेकरवाडीच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'अंधश्रद्धा निर्मूलन व कर्मकांड' या विषयावर विकास लवांडे बोलत होते. टिळेकरवाडी ग्रामपंचायत - लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांच्या दूरदृष्टी विचाराच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास साधला आहे. येथील असणारा एकोपा, धर्माच्या बाबतीत असणारी श्रद्धा, निष्ठा यांचा आदर्श घेण्यायोग्य असल्याचे मत महंत रविराजदादा पंजाबी यांनी मत मांडले. यावेळी जेष्ठ नेते राजेंद्र टिळेकर, श्री दत्त सेवा ट्रस्टचे अध्यक्ष संतोष टिळेकर, सरपंच गणेश टिळेकर, मा.सरपंच सुभाष लोणकर, मा.सदस्य राजेंद्र टिळेकर, प्रेमजी थोरात, आबासाहेब टिळेकर, सदाशिव टिळेकर, ओबीसी तालुका अध्यक्ष सुभाष टिळेकर, पोलीस पाटील विजय टिळेकर, सोसायटी चेअरमन अक्षय टिळेकर, श्री दत्त सेवा ट्रस्टचे विश्वस्त, ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### स्कुजो आइस 'ओ' मॅजिकचा विस्तार 40 टक्के बाजारपेठेचे लक्ष्य

**पुणे (आरंभ पर्व) :** देशातील सर्वात वेगाने वाढणारा जेलाटो आणि लाइव्ह-पॉपसिकल ब्रँड स्कुजो आइस 'ओ' मॅजिकने आपल्या विस्तार कार्यक्रमा अंतर्गत पुण्यात दोन आउटलेट्स उघडल्याची नुकतीच घोषणा केली. हडपसरमधील सीझन मॉल आणि विमाननगरमधील प्रसून कॉर्नर येथे कंपनीची उत्पादने उपलब्ध होणार आहेत. या ठिकाणी 'स्कुझो'ची गोड आणि आरोग्यदायी उत्पादने ग्राहकांना मिळावीत, हा कंपनीचा उद्देश आहे.पॉपसिकल्स सोबतच खास तयार केलेले मलईदार जिलेटो, वॅफल्स, मिल्कशेक,संडे आणि गरम पेयांसह विस्तृत मिष्टान्नांची श्रेणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुण्याच्या खाद्यान्न बाजारपेठेतील 40 टक्के हिस्सा प्राप्त करण्याच्या उद्देशाने वार्षिक 50 लाख रुपयांच्या गुंतवणुकीचीही घोषणा करण्यात आली आहे. स्कुजो आइस 'ओ' मॅजिकने मार्च 2025 पर्यंत पुण्यात आणखी 20 आउटलेट्स सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. स्कुजो आइस 'ओ' मॅजिकचे व्यवस्थापकीय संचालक महंमद फरहान म्हणाले, की दोन आउटलेट्सद्वारे पुण्याच्या बाजारपेठेत प्रवेश करताना आम्हाला आनंद होत आहे. हा प्रवास पॅशन आणि इनोव्हेशनचा आहे. नैसर्गिक घटकांचा वापर आणि शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्याची आमची बांधिलकी आहे. स्कुजो आइस 'ओ' मॅजिकचे हे पुण्यातील पहिले आणि देशातील 52 वे आउटलेट सुरू होणे, हे आमच्या देशाच्या कानाकोपऱ्यात अनोखी, नावीन्यपूर्ण आणि रुचकर पदार्थ सादर करण्याच्या मोहिमेतील आणखी एक पाऊल आहे.

# रणबीर कपूर ने केले बारात बाय तस्वा शोचे नेतृत्व

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला फॅशन रिटेल लि.चा ब्रँड तस्वाने दिग्गज डिझाइनर तरुण तहिलियानी यांच्यासोबत सहयोगाने संस्मरणीय फॅशन शो बारात बाय तस्वाचे आयोजन केले, ज्यामध्ये ब्रँडच्या ऑटम/विंटर 2024 वेडिंग कलेक्शनचे अनावरण करण्यात आले. नुकतेच, नवी दिल्ली येथे या भव्य इव्हेण्टचे आयोजन करण्यात आले. या इव्हेण्टने उपस्थितांच्या मनावर अतूट छाप निर्माण केली. या इव्हेण्टचे धमाकेदार समापन झाले, जेथे बॉलिवुड आयकॉन रणबीर कपूर यांनी भव्य फिनालेचे नेतृत्व केले आणि भारतीय विवाह सोहळ्यांच्या पैलूला अद्वितीय स्टाइल व भव्यतेसह साजरे करण्यात आले.



बारात बाय तस्वा उत्साही व वैविध्यपूर्ण भारतीय विवाह सोहळ्यामधून प्रेरित होते, जेथे या इव्हेण्टला नवरदेवाला प्रकाशझोतात आणणारे फॅशन प्रदर्शन म्हणून सादर करण्यात आले. नवरदेवाच्या उत्साही आगमनाचे प्रतीक असलेली बारात (वरात) या समकालीन व व्हिज्युअली आकर्षक फॅशन शोमध्ये सादर करण्यात आली.

अद्वितीय स्टाइल व करिष्मासाठी ओळखले जाणारे रणबीर कपूर यांनी तस्वा मॅनची भूमिका परिपूर्णपणे पार पाडली. त्यांनी भव्य भारतीय विवाह सोहळ्यामधील बारातसह शोचे समापन कले, जे या इव्हेण्टचे खास आकर्षण ठरले. इव्हेण्टमधील आपल्या सहभागाबाबत सांगताना रणबीर कपूर म्हणाले, बारात कलेक्शनमधील रनवेवर येण्याचा अनुभव उत्साहवर्धक होता, ज्याने पारंपारिक व आधुनिक पैलूंच्या संयोजनाला साजरे केले. आज, विवाह सोहळ्यांमध्ये वरांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे, ते त्याचे मुख्य आकर्षण बनले आहे. या कलेक्शनने त्यांना मूळ संस्कृती जपण्यासोबत त्यांच्या व्यक्तिमत्त्वांना सादर करण्याची संधी दिली. लक्झरीअस टेक्स्चर्स व आकर्षक सिल्हूट्ससह हे कलेक्शन मेन्सवेअरला नव्या उंचीवर घेऊन जाते आणि प्रत्येक नवरदेवचा प्रवास संस्मरणीय असण्याची खात्री देते.

> तस्वा भारतातील विवाह फॅशनसंदर्भातील मर्यादांना दूर करत आहे, तसेच प्रत्येक कलेक्शनसह नवरदेवाच्या स्टाइलला अधिक आकर्षक करत आहे. ब्रँड म्हणून तस्वामध्ये आमचा डिझाइनर इंडियन वेअर अधिकाधिक ग्राहकांना उपलब्ध करून देण्याचा मनसुबा आहे. आमच्या एडब्ल्यू24 वेडिंग कलेक्शनसह आम्हाला आधुनिक काळातील नवरदेवांना परंपरा व समकालीन डिझाइन्सचे स्टायलिश संयोजन देण्याचा आनंद होत आहे. आम्ही आधुनिक काळातील पुरूषांसाठी ब्रँड आहोत, जे त्यांच्या प्रासंगिक वेअरसाठी आधुनिकता व आकर्षकतेचा शोध घेत आहेत. आमचे प्रतिभावान स्टोअर स्टायलिस्ट्स त्यांच्यापैकी प्रत्येकाला सर्वोत्तम लुक प्राप्त करण्यास मदत करण्यासाठी नेहमी उपलब्ध आहेत. बारात बाय तस्वामधून आगामी विवाह सीझनसाठी या तत्त्वाला प्रत्यक्षात आणण्याप्रती आमच्या टीम्सचे प्रयत्न दिसून येतात आणि आम्हाला या इव्हेण्टचे आयोजन करण्याचा आनंद होत आहे, असे तस्वाचे ब्रँड प्रमुख आशिष मुकुल म्हणाले.

तसेच, अनेक प्रख्यात व्यक्तींनी उपस्थिती दाखवत रनवेची शोभा वाढवली, ज्यांनी या इव्हेण्टमध्ये त्यांची अद्वितीय मोहकता व स्टाइलची भर केली. उभारता सितारा विहान समत, सुप्रसिद्ध कॉमेडीयन अनुभव सिंग बसी, मिशलिन स्टार शेफ सुविर सरन आणि लोकप्रिय डिजिटल इन्फ्लूएन्सर्स मोहक नारंग, मानव छाब्रा, उन्नती मल्हारकर आणि अपूर्वा (द रिबेल किड म्हणून प्रसिद्ध) यांनी अनोख्या शान व स्वभावासह तस्वाच्या अपवादात्मक वेडिंग कलेक्शनला दाखवले. त्यांच्यापैकी प्रत्येकाने आपल्या स्वत:च्या स्टाइलमध्ये आधुनिक भारतीय नवरदेवाच्या उत्साहाला सादर केले, ज्यामध्ये परंपरा व समकालीन स्टाइलचे संयोजन पाहायला मिळाले. त्यांच्या उपस्थितीने शोच्या उत्साही, डायनॅमिक ऊर्जेमध्ये अधिक भर केली, ज्यामुळे बारात बाय तस्वा इव्हेण्ट व्यक्तिमत्त्व व फॅशनचे अस्सल साजरीकरण ठरली. आपल्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वांसह त्यांनी तस्वाच्या तत्त्वांच्या पैलूला सादर केले, ज्यामुळे हा इव्हेण्ट प्रेक्षकांसाठी अधिक संस्मरणीय ठरला.

## पिस्तूल बाळगणारा गुंड अटकेत

*गुलटेकडीत गुन्हे शाखेची कारवाई*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्या गुंडाला गुन्हे शाखेच्या पथकाने गुलटेकडी परिसरात पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि काडतूस जप्त करण्यात आले आहे. सज्जन सुनील जाधव (वय 19, रा. डांगे चौक, पिंपरी, मूळ रा. रेणुशीमोरा, महाबळेश्वर, जि. सातारा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. जाधव सराइत असून, त्याच्याविरुद्ध वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पथक गस्त घालत होते. गुलटेकडीतील डायस प्लॉट परिसरात जाधव थांबला होता. त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती पोलीस हवालदार उज्वल मोकाशी आणि शंकर कुंभार यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडे देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि काडतूस सापडले. पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप मानकर, सहायक निरीक्षक अमोल रसाळ, आशिष कवठेकर, उपनिरीक्षक नितीन कांबळे, शंकर नेवसे, निखिल जाधव, अमोल सरडे, साधना ताम्हाणे, पुष्पेंद्र चव्हाण, ओम कुंभार यांनी ही कारवाई केली.

## अल्पवयीन युवतीचा विवाह, मुलगी गर्भवती

### मुलीच्या पतीसह सासू, आई, वडिलांविरुद्ध गुन्हा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

युवती अल्पवयीन असताना तिचा बळजबरीने विवाह केल्याप्रकरणी पती, सासू, आई, वडिलांविरुद्ध खडकी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत युवतीने खडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तक्रारदार युवती 17 वर्षांची आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात तिचा बळजबरीने एका तरुणाशी विवाह लावून देण्यात आल होता. युवतीने विवाहास विरोध केला होता. युवती अल्पवयीन असल्याची माहिती पती, सासू, आई आणि वडिलांना होती. विवाहानंतर मुलगी गर्भवती झाली. वैद्यकीय तपासणीत ही बाब उघड झाली. त्यानंतर युवतीने नुकतीच याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक बेदगुडे तपास करत आहेत. अल्पवयीन युवतींना धमकावून, तसेच बळजबरी करून त्यांचे विवाह करण्यात येत असल्याचे प्रकार घडतात. अशा प्रकरणात तक्रारदार युवतींच्या कुटुंबीयांची परिस्थिती हलाखीची असते. हलाखीच्या परिस्थितीमुळे युवतींचे बळजबरीने विवाह लावून दिले जातात. बालविवाह कायद्यान्वये याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात येतात, तसेच युवती गर्भवती झाल्याचे वैद्यकीय तपासणीत उघडकीस आल्यानंतर वैद्यकीय तज्ज्ञ याबाबतची माहिती पोलिसांना देतात. विवाहाच्या आमिषाने तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी पोलिसांनी एका तरुणासह, त्याची आई आणि भावाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत पीडित तरुणीने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पीडित तरुणी आणि आरोपी तरुणाची ओळख झाली. ओळखीतून त्यांच्या प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने तरुणीला विवाहाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केला. तिने विवाहाबाबत विचारणा केली. तेव्हा छायाचित्रे, चित्रफीत समाजमाध्यमात प्रसारित करण्याची धमकी देण्यात आली. आरोपी तरुणाची आई आणि भावाने तिला शिवीगाळ केली. सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनात खांडेकर तपास करत आहेत.

### सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे निर्देश

## पुण्यात आता हेल्मेटसक्ती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाहन अपघातात निष्पाप नागरिकांचे बळी जाऊ नयेत यासाठी सर्व संबधित यंत्रणांनी रस्ते सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, त्यासाठी सर्वंकष धोरण तयार करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमूर्ती अभय सप्रे यांनी दिले. प्रशासनाने दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्ती करावी, असे त्यांनी बजाविले.

विधान भवन येथे आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, महानगरपालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, विभागीय आयुक्तालयाच्या उपायुक्त वर्षा लड्डा ऊंटवाल, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पिंपरी चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण आदी उपस्थित होते. बेदरकारपणे आणि बेजबाबदारपणे वाहने चालवून निष्पाप नागरिकांच्या बळींच्या संख्येत वाढ होत आहे ही गंभीर बाब आहे, असे सांगून न्यायमूर्ती सप्रे म्हणाले की, रस्ता अपघात कमी व्हावे, अपघातातील जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावे, बळींची संख्या कमी व्हावी याची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यासाठी वेळोवेळी मार्गदशक तत्वे निश्चित केली केली असून सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली रस्ता सुरक्षा समिती स्थापन केली आहे. ही समिती कायमस्वरूपी कार्यरत असून रस्ता सुरक्षेसंदर्भात उपाययोजना आणि त्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती थेट सर्वोच्च न्यायालयास सादर करते. निष्पाप नागरिकांच्या रस्ते अपघातात बळींची संख्या लक्षात घेता परिवहन विभाग, पोलीस विभाग तसेच सर्व



संबंधित शासकीय यंत्रणांनी सकारात्मकतेने काम करावे. अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक बजावण्याबरोबरच निस्वार्थ भावनेने काम करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ता सुरक्षेसंबधी नियमांची कठोरपणे अंमलबजावणी करावी. अपघातातील बळींची संख्या कमी होण्यासाठी प्रयत्न करावे. या बैठकीत दिलेल्या निर्देशांचे सर्व संबधित यंत्रणांनी गांभीर्यपूर्वक पालन करावे. वाहनांच्या संख्येत वाढ होत असल्याने रस्ता सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनीही वाहतूकीचे नियम स्वयंस्फूर्तीने पाळणे आवश्यक आहे.

# राष्ट्रीय योग संमेलनात झाला विविध धर्मीय ऐक्याचा उत्सव जागर

**लोणावळा (दै. आरंभ पर्व)**

कैवल्यधाम येथे आज राष्ट्रीय योग संमेलन, "योग - एक सांस्कृतिक स्वरसमन्वय, आध्यात्मिक परिमाण" या दोन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमात विविध धर्मातील आध्यात्मिक गुरुंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जैन, हिंदू, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन आणि पारशी धर्माच्या आध्यात्मिक गुरुंनी योग या विषयाबद्दल आपले विचार मांडले आणि चर्चा केली.




हरिद्वार येथील सुरतगिरी बंगलाचे अध्यक्ष आणि मुंबईतील संन्यास आश्रमचे अध्यक्ष स्वामी विश्वेश्वरानंद गिरी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय योग संमेलनाचे उद्घाटन झाले. तसेच या प्रसंगी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेले जैन आध्यात्मिक गुरु, अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक अध्यक्ष आचार्य लोकेश मुनि, तिबेटी बौद्ध लामा व आध्यात्मिक मार्गदर्शक चोक्योंग पाल्गा रिनपोचे, मुंबईतील द योगा इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष मा हंसा जी योगेंद्र आणि शताब्दी समितीचे अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री श्रीयुत सुरेश प्रभू हे मान्यवरही उपस्थित होते.

उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान कैवल्यधामचे अध्यक्ष डॉ. ओ. पी. तिवारी यांनी भूषवले, तर महामहोपाध्याय रिनपोचे यांचे बीजभाषण झाले. दोन दिवसीय या कार्यक्रमाचा समारोप बिहार स्कूल ऑफ योगचे पद्मभूषण परमहंस स्वामी निरंजनानंद सरस्वती यांच्या उपस्थितीत होणाऱ्या समारोप सत्राने होईल.

कैवल्यधामचे अध्यक्ष डॉ. ओ. पी. तिवारी म्हणाले, "योग हा विविध समुदाय, प्रांत, परंपरा आणि धर्म यांच्यामधील सांस्कृतिक ऐक्य साधणारा एकत्वाचा शक्तिशाली आधार आहे. या संमेलनात विविध धर्मातील प्रबुद्ध आध्यात्मिक गुरु त्यांच्या विचारांची मांडणी करण्यासाठी उपस्थित आहेत, याबद्दल आम्ही आभारी आहोत.

या सत्रांतून सर्व सहभागींना योगाच्या माध्यमातून जीवनातील उच्च उद्दिष्ट साध्य करण्याबाबत मौल्यवान शिकवण मिळेल." योग हा शिक्षण आणि साधनेच्या माध्यमातून आध्यात्मिक विकासासाठी एक महत्त्वाचा उत्प्रेरक आहे, यावर चर्चा करण्यात आली.

या चर्चासत्रांमध्ये आध्यात्मिक गुरु आणि प्रख्यात विद्वानांनी दिलेल्या अनुभवसत्रांतून सहभागींना ज्ञान मिळाले. इतर मान्यवर वक्त्यांमध्ये अर्ज विद्या गुरुकुलचे संस्थापक स्वामी परमात्मानंद सरस्वती, प्रख्यात विद्वान आणि माजी खासदार डॉ. सत्य पाल सिंह, योग साधना मंदिरचे संस्थापक डॉ. सबीर शेख, जागतिक वेलनेस गुरु डॉ. मिकी मेहता, आणि लोणावळ्यातील डॉन बॉस्कोचे एसडीबी-रेक्टर डायरेक्टर फादर ब्लानी पिंटो यांचा समावेश होता.

1924 मध्ये स्वामी कुवल्यानंद यांनी स्थापन केलेले कैवल्यधाम हे जगातील एक अग्रगण्य आणि सर्वात जुने योग संस्थान आहे. पतंजलींच्या अष्टांग योगाच्या तत्त्वे आणि तत्त्वज्ञानाचे पालन करत कैवल्यधाम पारंपारिक योग शुद्ध स्वरूपात शिकवते. योगाचे फायदे आणि उपयोग वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध करणारे हे पहिले योग संस्थान आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.